4 OCT 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवपावन पदभ्रंमती मोहीम फत्ते

## शिवाजी विद्यापीठ व सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले पन्हाळा ते पावनखिंड असा शिवपावन पद्भ्रमंती मोहीम विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्साहाने सळसळत्या स्वयंसेवकांच्या साथीने कुलगुरू देवानंद शिंदेंसह कुटुंबीयांनी पंचावन्न किलोमीटरच्या या मोहिमेत सहभाग घेतला.



शिवाजी विद्यापीठ व सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले पन्हाळा ते पावनखिंड या मोहिमेत शिवपावन पदभ्रमंती मोहिमेत सहभागी विद्यार्थ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

यावेळीयेळवण जुगाईचेउपसरपंच सत्यवान खेतल यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांचा शिवछत्रपतींची मूर्ती देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर शहाजी छत्रपती महाविद्यालयाचा विद्यार्थी अर्जुन मिरजकर व शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी शुक्रिया मगदूम पांढरेपाणी परिसरात सर्वप्रथम पोहोचल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. राजनंदिनी पाटील व कैवल्य शिंदे या पाच वर्षीय चिमुरड्यांनी ही मोहीम पूर्ण केल्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मलकापूरचे नगरसेवक सुहास पाटील, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, डॉ. संगीता पाटील उपस्थित होते. प्रदीप थोरवत, सुजित जाधव, राजेंद्र काटकर, अक्षय पाटील, प्रसाद पाटील, प्रवीण केंबळे, चंद्रकांत वाघ, शुभम कोळी, सागर पाटील, संग्राम मोरे यांनी संयोजन केले. प्राचार्य डी. डी. कुरळपकर यांनी आभार मानले. दरम्यान, सह्याद्री प्रतिष्ठनचे चिफ पेट्रन खा. संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते मोहिमेचे उद्घाटन झाले.

यावेळी नगराध्यक्ष रूपाली धडेल, ज्येष्ठ शस्त्र संग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, हेमंत साळोखे उपस्थित होते. करपेवाडी मुक्कामी शाहीर रंगराव पाटील यांनी शाहिरी कला सादर केली. इतिहास अभ्यासक राम यादव यांनी पन्हाळा ते पावन परिसर घडलेल्या इतिहासाची माहिती दिली, तर अभिलेखापाल गणेशकुमार खोडके यांनी शिवरायांची पत्रे या विषयी माहिती दिली.

4 OCT 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवछत्रपतींचा आदर्श घ्या

## डॉ. शिंदे : विद्यापीठ, सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे शिव पावन पदभ्रमंती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवछत्रपतींचा आदर्श घेऊन तरुणांनी समाजाभिमुख विकास घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'शिव पावन पदभ्रमंती' (पन्हाळा ते पावनखिंड) मोहिमेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. तत्पूर्वी पांढरेपाणी ते पावनखिंड मार्गे पालखी मिरवणूक काढण्यात आली. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'हर हर महादेव' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "सिद्दी जौहारच्या वेढ्यातून शिवछत्रपती सहीसलामत सुटावेत, यासाठी बाजीप्रभू देशपांडे, फुलाजीप्रभू देशपांडे, बांदल मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. स्वराज्यासाठी जीवावर उदार होऊन लढण्याची त्यांची तयारी होती. आजही पावनखिंड परिसरात घडलेला इतिहास तरुणांना प्रेरणा देत आहे. ही प्रेरणा आत्मसात करून तरुणांनी समाजाच्या विकासासाठी योगदान देणे आवश्यक आहे."



कोल्हापूर : शिव पावन पदभ्रमंती मोहिमेच्या समारोप प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. पी. डी. राऊत, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. डी. के. गायकवाड, उपसरपंच सत्यवान खेतल, प्राचार्य डी. डी. कुरळपकर, प्रदीप थोरवत आदी.

या वेळी येळवण जुगाईचे उपसरपंच सत्यवान खेतल यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांचा शिवछत्रपतींची मूर्ती देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर अर्जुन मिरजकर व सुक्रिया मगदूम पांढरेपाणी परिसरात सर्वप्रथम पोचल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. राजनंदिनी पाटील व कैवल्य शिंदे या पाच वर्षीय चिमुरड्यांनी ही मोहीम पूर्ण केल्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले. विशेष म्हणजे ५५ किलोमीटरची ही मोहीम कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह कुटुंबीयांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली. या प्रसंगी डॉ. डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, नगरसेवक सुहास पाटील, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, डॉ. संगीता पाटील उपस्थित होते. प्रदीप थोरवत, सुजित जाधव, राजेंद्र काटकर, अक्षय पाटील, प्रसाद पाटील, प्रवीण केंबळे, चंद्रकांत वाघ, शुभम कोळी, सागर पाटील, संग्राम मोरे यांनी संयोजन केले. प्राचार्य डी. डी. कुरळपकर यांनी आभार मानले.

### दप्तरांचे वाटप

खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते मोहिमेचे उद्घाटन झाले. या वेळी नगराध्यक्ष रूपाली धडेल, ज्येष्ठ शस्त्रसंग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत साळोखे उपस्थित होते. वाड्या-वस्त्यांवरील मुलांना दप्तरांचे वाटप झाले. राम यादव यांनी पन्हाळा ते पावनखिंड परिसरात घडलेल्या इतिहासाची माहिती दिली; तर अभिलेखापाल गणेशकुमार खोडके यांनी शिवरायांची पत्रे विषयावर मार्गदर्शन केले.

4 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**पावनखिंड परिसर जयजयकाराने दुमदुमला : शिवाजी विद्यापीठ, सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे आयोजन**

# शिवपावन पदभ्रमंती सळसळत्या उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी-जय शिवाजी', 'हर-हर महादेव', अशा घोषणा, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सळसळता उत्साह अशा वातावरणात शिवपावन पदभ्रमंती मोहीम सोमवारी पार पडली.

शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे किल्ले पन्हाळा ते पावनखिंड परिसर अशी 'शिवपावन पदभ्रमंती' मोहीम रविवारी (दि. १) आणि सोमवारी आयोजित करण्यात आली होती. सह्याद्री प्रतिष्ठानचे चीफ पेट्रन खासदार संभाजीराजे यांच्या हस्ते मोहिमेचे उद्‌घाटन झाले. यावेळी पन्हाळ्याच्या नगराध्यक्षा रुपाली धडेल, ज्येष्ठ शस्त्रसंग्राहक गिरीश जाधव, रवी धडेल, सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत साळोखे उपस्थित होते. शिवपावन पदभ्रमंती मोहिमेचा समारोप सोमवारी पावनखिंडीत झाला. त्यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते पावनखिंड परिसरातील फरसबंदी मार्गाचे पूजन करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठ आणि सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे काढण्यात आलेल्या शिवपावन पदभ्रमंतीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

याआधी पांढरेपाणी ते पावनखिंडमार्गे पालखी मिरवणूक काढण्यात आली. शिवकालीन युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांनी विद्यार्थी रोमांचित झाले. यावेळी येळवण-जुगाईचे उपसरपंच सत्यवान खेतल यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे आणि पांढरेपाणी येथे सर्वप्रथम पोहोचलेल्या अर्जुन मिरजकर, शुक्रिया मगदूम यांचा सत्कार करण्यात आला. राजनंदिनी पाटील व कैवल्य शिंदे या पाचवर्षीय चिमुरड्यांनी ही मोहीम पूर्ण केली. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, एनएसएसचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मलकापूरचे नगरसेवक सुहास पाटील, नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, डॉ. संगीता पाटील, प्राचार्य डी. डी. कुरळपकर उपस्थित होते. दरम्यान, पदभ्रमंती मार्गावरील वाड्या-वस्त्यांवरील मुलांना कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते दप्तरांचे वाटप झाले. करपेवाडी मुक्कामी शाहीर रंगराव पाटील यांनी शाहिरी सादर करत विद्यार्थ्यांची मने जिंकली. इतिहास अभ्यासक राम यादव यांनी पन्हाळा ते पावन परिसर घडलेल्या इतिहासाची, तर अभिलेखापाल गणेशकुमार खोडके यांनी 'शिवरायांची पत्रे' याविषयी माहिती दिली.

## कुलगुरुंचा सहभाग

कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सुमारे ५५ किलोमीटरची शिवपावन पदभ्रमंती मोहीम कुटुंबीयांसह यशस्वीरित्या पूर्ण केली. या मोहिमेत पत्नी अनिता, मुलगा शंतनू, मुलगी कैरवी यांच्यासह सहभागी झाले होते.

## विकासासाठी पुढाकार घ्यावा

शिवछत्रपतीचा आदर्श घेऊन तरुणांनी समाजाभिमुख विकास घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिंदे यांनी मोहिमेच्या समारोपावेळी केले. ते म्हणाले, आजही पावनखिंडीचा इतिहास तरुणाईला जाज्वल्य देशप्रेमाची प्रेरणा देत आहे. ही प्रेरणा आत्मसात करुन तरुणांनी समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे.

4 OCT 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासू वक्ता काळाची गरज

## डी. टी. शिर्के : डी. बी. पाटील वक्तृत्व स्पर्धा बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**विजेते असे :** या स्पर्धेत पूर्वा कोडोलीकर (कालिदास महाविद्यालय, रामटेक नागपूर) हिने प्रथम क्रमांक पटकाविला. तेजस्विनी पांचाळ (न्यू कॉलेज, कोल्हापूर) हिने द्वितीय आणि अनिल कांबळे (किसनवीर महाविद्यालय, वाई) हिने तृतीय क्रमांक मिळविला. स्वरदा फडणीस (केआयटी कॉलेज, कोल्हापूर) ही उत्तेजनार्थ विजेती ठरली.

**कोल्हापूर :** आधुनिकीकरण, संगणकीय जगामध्ये प्रभावी व चिंतनशील वक्ते कमी होत चालले आहे. त्यामुळे महाविद्यालयीन स्तरावर प्रभावी आणि अभ्यासू वक्ता तयार करणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले.

येथील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील होते. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, वक्ता हा समाजपरिवर्तनाचा प्रभावी घटक असतो. अभ्यासपूर्ण मांडणी ही व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करत असते. अशा विविध स्तरांवरील वक्तृत्वामुळे समाजपरिवर्तनाला चालना मिळते. वक्तृत्व ही एक साधना असून वाचनाची रियाज केल्याशिवाय वक्तृत्वाची कला साध्य होऊ शकत नाही. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पाटील म्हणाले, 'वाचाल, तर वाचाल', 'खेळाल तर टिकाल' आणि 'बोलाल तर समाजाला वाचवाल' म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने भरपूर वाचन केले पाहिजे. या कार्यक्रमास आर. डी. पाटील, सी. आर. गोडसे, पी. के. पाटील, एस. जे. नाईक, टी. के. सरगर, अविनाश पाटील, ए. जी. सूर्यवंशी, बी. डी. गिरीगोसावी, एस. एन. इनामदार, एच. के. सोनाळकर, एस. जी. पाटील आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांनी स्वागत केले. विनय पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. अनिता मगर, संपदा मिराशी यांनी सूत्रसंचालन केले. जी. आर. पाटील यांनी आभार मानले.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक प्रा. विनय पाटील यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी प्रा. शिवाजी भुकेल्ले, चंद्रकांत पोतदार, जी. पी. माळी, सी. सी. चव्हाण, दीपककुमार वळवी, अरुण शिंदे, सुजित पाटील, हिमांशू स्मार्त यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

4 OCT 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम वस्त्रोद्योग अभ्यासक्रमास सुरुवात

## शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार, प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ : दहावी उत्तीर्णतेची अट : पदविकेनंतर उद्योग सुरू करण्याची परवानगी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम व रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम तयार केला आहे. २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेता येणार आहे. या अभ्यासक्रमांतर्गत रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांना तुती लागवडीपासून ते तयार झालेल्या रेशीमची बाजारपेठेत विक्री कशी केली पाहिजे, इथपर्यंत सगळया गोष्टीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

यामुळे पश्चिम महाराष्ट्रामध्ये रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पदविका प्रमाणपत्र मिळाल्यानंतर रेशीम वस्त्रोद्योगाची उत्पादकता व गुणवत्ता वाढणार आहे. अशा प्रकारचा पदविका अभ्यासक्रम भारतात पहिल्यांदाच तयार केला गेला आहे. विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात (डिप्लोमा इन सेरीकल्चर) रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम एक वर्षासाठी सुरू केला आहे. रेशीम उद्योग करणाऱ्या अनुभवी शेतकऱ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल. रेशीम उद्योग करणाऱ्या दहावी उत्तीर्ण शेतकऱ्यांनाही या अभ्यासक्रमाचा लाभ होणार आहे. दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना या प्रशिक्षण वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून परदेशातील रेशीम संस्थांशीही सामंजस्य करार केला जाणार असल्याची माहिती डॉ. ए. डी. जाधव यांनी दिली.



या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून (सॉईल टू सिल्क) तुती लागवडीपासून रेशीम कामड निर्मितीपर्यंत समग्र ज्ञान आणि तंत्रज्ञान देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना कृषी अनुषंगिक क्षेत्रातील ज्ञान प्राप्त झाले तर स्वत:चा रेशीम उद्योग सुरू करण्यासाठी अडचणींचा सामना कसा केला पाहिजे, याचे प्रशिक्षणही या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिले जाणार आहे.

या अभ्यासक्रमात 'तुतीची लागवड', 'रेशीम किटकांचे संगोपन', 'तुती व रेशीम किटकांचे रोग आणि किडींचे व्यवस्थापन', 'बाजारपेठ आणि कोष विक्री व्यवस्थापन', 'रेशीम धागा आणि कापड निर्मिती', 'रेशीम शेतीच्या भविष्यातील संधी', 'रेशीम उद्योकता विकास', 'मूल्यवर्धीत उत्पादने आणि कौशल्य विकास', या प्रमुख विषयांचा समावेश आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकूनच डॉ. ए. ए. जाधव व विभागप्रमुख डॉ. पी. डी. यादव यांच्या संकल्पनेतून हा अभ्यासक्रम तयार केला आहे. यळगूड, रेंदाळ, हुपरी, कागल, चंदगड, गडहिंग्लज, आजरा, पन्हाळा आदी ३५ ठिकाणचे शेतकरी रेशीम उद्योग करीत आहेत.

### तरुणांनी रेशीम उद्योग करावा

भारतात ४० टक्के रेशीम खरेदी तयार केले जाते. तर ६० टक्के इतर देशातून आयात केले जाते. त्यामुळे इतर देशाला भारतीय चलन जाते. हे चलन थांबवण्यासाठी हे पीक अतिशय महत्त्वाचे आहे. हा व्यवसाय पारंपरिक उद्योग बनला पाहिजे. कारण १ महिन्यात पीक येते, बाजारात चांगला दर मिळतो. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तरुण शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल.

– विश्वास खोत (शेतकरी)

### शेतकऱ्यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या व्यवसायाला प्रतिष्ठा मिळावी हाच विद्यापीठाचा उद्देश आहे. म्हणून पदविका आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम तयार केला आहे. रेशीम उद्योगाचा प्रसार आणि प्रचार करणे, तसेच शेतकरी बेंगलोर, कर्नाटकमध्ये रेशीम बाजारपेठेत जातात तेंव्हा त्यांना प्रतिष्ठा मिळत नाही. या शेतकऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहणार आहे.

– डॉ. पी. डी. राऊत (प्राणीशास्त्र विभागप्रमुख)

### एमएस्सी पूर्ण करतानाच पदव्युत्तर पदविका

प्राणीशास्त्र विभागात एमएस्सी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर प्रमाणपत्राबरोबर पदविका पदव्युत्तर प्रमाणपत्र मिळणार आहे. एकाचवेळी दोन पदवी प्रमाणपत्र मिळाल्याने, केंद्रीय रेशीम मंडळ भारत सरकार व राज्य शासन रेशीम संचलनालयात या विद्यार्थ्यांना काम करण्यास प्राधान्य मिळणार आहे.

4 OCT 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात स्वच्छता अभियानास प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात दरवर्षीप्रमाणे यंदाही राबविण्यात आलेल्या विद्यापीठ परिसर स्वच्छता अभियानाला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक तसेच विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. विद्यापीठाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

गेल्या दोन वर्षांपासून स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकमुक्ती करण्यात आली होती. परिणामी, सर्वच घटकांमध्ये याविषयी झालेल्या जागृतीमुळे यंदाच्या सफाईदरम्यान अत्यल्प प्लास्टिक सापडले. हे या मोहिमेचे वैशिष्ट्य ठरले. मानव्यविद्या इमारतीमधील अधिविभागांनी परिसरात प्लास्टिकमुक्ती व छत स्वच्छता मोहीम राबविली.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी हातात खराटे घेऊन स्वच्छतेला सुरुवात केली. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रशासकीय सेवकांनी त्यांना नेमून दिलेल्या एनसीसी भवन गेटपर्यंतच्या परिसरामध्ये, तर अधिविभागांनी आपापल्या परिसराची स्वच्छता केली. ग्रंथालयाच्या अभ्यासिकेमधील विद्यार्थ्यांनीही विद्यापीठाच्या आवाहनाला प्रतिसाद देत उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियानात सहभाग घेतला आणि ग्रंथालयाचा परिसर चकाचक केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसराची स्वच्छता करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत इतर सहकारी.

यंदाच्या मोहिमेदरम्यान विद्यापीठ परिसरातील प्लास्टिक व काचेच्या कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटल्याचे स्पष्ट झाले. स्वच्छता मोहिमेतून विद्यार्थ्यांसह सर्व संबंधित घटकांमध्ये झालेल्या जागृतीचेच हे लक्षण आहे, अशी भावना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील शिवपुतळ्याचा उद्यान परिसर स्वच्छ केला. त्यानंतर त्यांनी परीक्षा भवनसह कॅम्पसवरील प्रत्येक अधिविभागाला प्रत्यक्ष भेट देऊन स्वच्छता अभियानाची पाहणी केली. सहभागी विद्यार्थ्यांचे प्र-कुलगुरू डॉ. शिंदे यांनी अभिनंदन व कौतुक केले. अभियानानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले. त्यानंतर गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी उपस्थितांना अहिंसा, शांततेची तसेच स्वच्छतेची शपथ दिली.